# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/01/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## खुन करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— दिनांक २०/१२/२०१९ चे ०५.२९ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. शोभा किशोर कामडी, वय ३५ वर्ष, रा. सालईधाबा यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अप. क्र. ४४०/२०१९ कलम ३०२, ३२४, ३४ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १९/१२/२०१९ चे २०.०० वा. ते २९.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— १) प्रकाश गुलाबराव मसराम, वय ३७ वर्ष २) रंजीत गुलाबराव मसराम, वय ३४ वर्ष, रा. दोन्ही रा. सालईधाबा यांनी जुन्या भांडणाचे कारणावरून संगनमत करून नमुद घटना वेळी व ठिकाणी मृतक नामे— विथीषन श्रीराम कामडी, वय ४२ वर्ष, रा. साईधाबा यास कुऱ्हाडीने व सब्बलने मारून गंभीर जखमी केले. मृतकास मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. तसेच मृतकाच्या भावास सुद्धा मारपीट करून जखमी केले.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक विनोद ठाकरे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. दिंनाक ३०/०१/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. साळुंके, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भांदवि मध्ये प्रत्येक आरोपीस आजीवन कारावास तसेच प्रत्येकी १०,०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास, कलम ३२४, ३४ भादंवि मध्ये प्रत्येकी ओरापीस ०६ महिने सश्रम कारावास व ५०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री जिकार यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक फौजदार ब. नं. १४५१ सुभाष धपके, पोस्टे एमआयडीसी बोरी यांनी मदत केली आहे.

## खुन करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. मौदा** :— दिनांक ०१/११/२०२० चे २२.३८ वा. दरम्यान फिर्यादी नामे— दिपक विवके लोखंडे, वय ६१ वर्ष, रा. पांडुरंग ले आउट खामला नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अप. क्र. ५४९/२०२० कलम ३०२, ५०४ भांदवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०१/११/२०२० चे १६.०० वा. ते १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे ठेकेदार असुन मृतक नामे— विष्णु राऊत व आरोपी नामे— राजु भुरणलाल डोंगरे, वय ५० वर्ष, रा. रामगडी किरणापुर ता. जि. बालाघाट हे फिर्यादीच्या NTPC च्या अंश तलावामागील पंप हाऊस येथे मिस्त्रीचे काम करत होते. मृतकाने नमुद आरोपीस तुला मिस्त्रीचे काम येत नाही तु हेल्पर आहे असे म्हटल्याने मृतक व आरोपी मध्ये वाद झाला. आरोपीने वादाचा राग मनात धरून मृतक आपल्या खोलीत झोपला असता आरोपीने मृतकाच्या डोक्यावर मोठा दगड घालुन जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरण्याचे तपास पोलीस निरीक्षक मधुकर गिते यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक ३०/०१/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. अग्रवाल अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भांदवि मध्ये आजीवन कारावास तसेच ५०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती साई खेडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस शिपाई ब. न. १३२१ विकास वाटकर पोस्टे मौदा यांनी मदत केली आहे.

## दुखापत

१) **पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावरील मौजा खापा येथे दिनांक २९/०१/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. सुमन रमेश सुरजूसे, वय ५० वर्ष, रा. खापा व आरोपी नामे— 1) रत्नमाला देवराव सूरजूसे, २) पायल सूरजूसे ३) दिनेश सूरजूसे तिन्ही रा. खापा हे शेजारी राहत असुन यातील फिर्यादी हे आपले घरी अंगण झाडत असता आरोपी क्र. १), २) व ३) हे आपले अंगणात फिर्यादीला पाहुन शिवागाळ करीत होते तसेच आरोपी क्र. २ यांनी फिर्यादीला दगड फेकुन मारले त्यामुळे फिर्यादीचे डोक्याचे मागचे भागाला मार लागला तेव्हाच आरोपी क्र. १ व ३ यांनी फिर्यादीस म्हटले की हे अंगणा समोरील सरकारी रोडची जागा आमची आहे व या ठिकाणी तुम्ही कचरा टाकायचा नाही या कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भा.द.वी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नारायण बोरकर ब. नं १२९७ मो. नं ९८२३५८१२९७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत १० किमी अंतरावरील कांद्री वस्ती ता. रामटेक येथे दिनांक २८/०१/२०२३ चे १५.०० वा. ते १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– कु. प्राजक्ता भिमराव पाटील, वय २५ वर्ष रा. कांद्री वस्ती ता. रामटेक व आरोपी नामे– १) कुंदन लांजेवार २) राजा लांजेवार ३) आकांशा लांजेवार ४) आचल लांजेवार सर्व रा. कांद्री वस्ती ता. रामटेक हे एकमेकांच्या घराशेजारी राहतात. नमुद घटनावेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी संगणमत करून जागेच्या कारणावरून झगडा भांडण करून फिर्यादीचे वडीलास विट फेकुन मारली तसेच फिर्यादीस डोक्यावर काठीने मारून जखमी करून शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३३६, ३२४, ५०४, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक नितेश पिपरोदे ब. नं. १९८८ पो.स्टे. रामटेक मो. नं. ९९२१७११९५५ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत डोंगरगाव काटोल येथे दिनांक २९.०१.२०२३ ते १९.०० वा. ते १९.१० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे– श्रीराम आत्माराम मेश्राम, वय ५० रा. डोंगरगाव त. काटोल यांचा मुलगा मृतक नामे– मनोज मेश्राम हा नेहमी मिस्त्री कामाला आपले मोटरसायकल क्र. एम.एच– ४०/सी.जी–८३०२ ने येणे जाणे करीत होता. फिर्यादीचा मुलगा मिस्त्री कामाकरीता गेला असता सायंकाळी परत येत असता डोंगरगाव जवळ कोणीतरी अज्ञात वाहनाने धडक मारली त्यामुळे त्याचे उजवे कानाचे वर मार लागून रक्त निघत होते. पोलीसांचे मदतीने फिर्यादीचा मुलगा याला गाडीत टाकून ग्रामीण रूग्णालय काटोल येथे नेले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यार्दी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ, भादंवि सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक संतोश राठोड मो. क्र. ८६६८२८४५६८ हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील तार बाजार काटोल येथे दिनांक २९/०१/२०२३ ते दिनांक ३०/०१/२०२३ चे २३.०० वा. ते ०४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— जगदीश बारकुजी ढोक, वय ५३ वर्ष, रा. कुणबीपुरा काटोल व फिर्यादीचा भाऊ नामे— रामेश्वर बारकुजी ढोक यांच्या नावाने असलेले नेहरू मार्केट येथील ढोक बंधु किराणा दुकान असुन दिनांक २९/०१/२०२३ रोजी चे सायंकाळी ०७.३० वा. सुमारास किराणा दुकान बंद केले असता दिनांक ३०/१/२०२३ रोजी चे सकाळी ०४.०० वा. दरम्यान फिर्यादीला पोलीस स्टेशन काटोल येथील पेट्रोलिंग कर्मचारी यांनी फिर्यादीला फोनव्दारे सांगितले की, तुमचे किराणा दुकानाचे लॉक तुटुन बाजुला पडलेले आहे. असे सांगितल्यावरून फिर्यादी आपल्या दुकानात गेले असता व दुकानाचे शटर उघडुन काऊंटरचे डॉव्हर चेक केले असता काऊंटरमध्ये डॉव्हर मध्ये ठेवलेली रक्कम त्यामध्ये १०/—रू. ०३ बंडल एकुण ३०० नोटा असा एकुण ३०००/—रू. व ५०/—रू. चे एक बंडल त्यामध्ये एकुण ११० नोटा एकुण ५५००/—रू. १००/—रू. च्या २० नोटा असे एकुण २०००/—रू. ५००/—रू. च्या १९ नोटा एकुण ९५००/—रू. असे एकुण २०,०००/—रू. त्यामध्ये नव्हते. तसेच फिर्यादीचे दुकानापासुन २० मीटर अंतरावर अविनाश शंकरराव केने, वय रा. काटोल यांचे दिपक जनरल स्टोअर्स दुकानाचे शटरचे कुलुप तोडुन शटर वाकवुन दुकानाचे काऊंटरमधुन २२,६००/—रू. ज्यामध्ये ५००रू च्या २५ नोटा एकुण १२,५००/—रू. २००रू च्या २० नोटा एकुण ४००रू. १००रू च्या ३५ नोटा एकुण ३५००/—रू. ५० रू च्या २२ नोटा एकुण ६००रू. १० रू. चे ०४ बंडल एकुण ४०० नोटा ४०००/—रू. ०५रू. चे ०३ बंडल एकुण ३०० नोटा असे एकुण २२५००/—रू. तसेच शेजारी असलेले विकास उदयसिंग परमार, रा. सरस्वती नगर काटोल यांचे बालाजी किराणा दुकानाचे शटरचे कुलुप तोडुन त्यांचे डीव्हीआर किमती ९०००/—रू. व काऊंटरमधुन ५०००/—रू. नगदी चोरून नेले. कोणीतरी अज्ञात चोरांनी फिर्यादीचे ढोक बंधु किराणा दुकानाचे कुलुप तोडुन शटर उघडुन काऊंटरमधुन २००००रू. नगदी अविनाश शंकर केने, रा. काटोल यांच्या दुकानातुन २२५००/—रू. नगदी, विकास उदयसिंग परमार रा. सरस्वती नगर काटोल यांचे दुकानातुन डीव्हीआर व काऊंटरमध्ये असलेली ५०००/—रू. नगदी असा एकुण ४७,५००/—रू. नगदी व डीव्हीआर किमती अंदाजे ९०००/—रू. असा एकुण ५६,५००/—रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मनापोशि/१७६२ सुनिता साठवणे मो. नं. ७७२२०३६७४४ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**